| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | ३१/०५/२०२२ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | ३१/०५/२०२२ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | २२/११/२०२२ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | २२/११/२०२२ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | २२/११/२०२२ |
| ६. | निकालीसाठी राखीव ठेवल्याची तारीख | २१/०५/२०२४ |
| ७. | निकाल तारीख | २१/०५/२०२४ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | नाही. |
| ९. | कालावधी | ०१ व. ०६ म. ०० दि. |
| १०. | जप्त मुद्देमाल | देशी दारुच्या १७ बॉटल्या प्रत्येकी ९० मिली. |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | आरोपी अटक तारीख | आरोपीस जामीन दिल्याची तारीख | गुन्हा | आरोपीस शिक्षा /निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुधाकर विठोबा गुरनुले | सुचनापत्र | -- | म.दा.का. कलम ६५ (ई) | निर्दोष | नाही | नाही. |

**न्यायनिर्णय**

**(घोषीत दिनांक २१/०५/२०२४)**

प्रस्तुतचा खटला आरोपी सुधाकर विठोबा गुरनुले याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) नुसार चालला.

## मुद्दे व निष्कर्ष

२) विद्वान सरकारी वकील गैरहजर. त्यामुळे त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला नाही. आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. गेडाम यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. आरोपी पक्षाचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ३१/०५/२०२२ रोजी १८.३० ते १९.०० वाजताच्या दरम्यान मौजे तुकुम सावली येथे आरोपीच्या चहा नास्त्याचे हॉटेलमध्ये, आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या १७ नग देशी दारुच्या प्रत्येकी ९० मिलीच्या बॉटल्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | : | नाही |
| २ | अंतीम आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३) अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतुने दोन साक्षीदार तपासले आहेत. खबरी साक्षीदार क्र.१ धिरज गुरुनाथ पिद्दुरकर व साक्षीदार क्र. २ तपासी अंमलदार रामकिसन बाबुरावजी बोधे यांना तपासले आहे. या तोंडी पुराव्याव्यतिरीक्त अभियोग पक्षाने घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा (निशाणी १२), खबर (निशाणी १३), छापिल प्रथम खबर अहवाल (निशाणी १४), सि.ए. फॉर्म (निशाणी १५) व रासायनिक पृथ्थकरण अहवाल

(निशाणी १६) असा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

४) अभियोगपक्षाला पंच साक्षीदार व नमुना बॉटली वाहुन नेणाऱ्या कर्मचाऱ्याची साक्ष नोंदविण्यासाठी वारंवार संधी देण्यात आली. परंतु अभियोगपक्ष सदर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवु शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी ०१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

५) आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले. सदर बयाणात आरोपीने अभियोगपक्षाचे संपुर्ण कथानक नाकारले आहे. आरोपीने त्याचे बचावात साक्षीदार तपासले नाहीत.

**मुद्दा क्रमांक ०१ करीता**

६) खबरी साक्षीदार क्र.१ धिरज यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दिनांक ३१/०५/२०२२ रोजी ते व इतर कर्मचारी असे गस्त घालीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, मौजे तिनकवाडी येथे आरोपी हा त्याचे हॉटेलमध्ये दारु बाळगुन आहे. सदर माहितीनंतर ते माहितीच्या ठिकाणी गेले असता आरोपी त्यांना मिळुन आला. त्यानंतर त्यांनी पंचासमक्ष आरोपीचे हॉटेलची झडती घेतली असता त्यांना आरोपीच्या हॉटेलमध्ये १७ नग देशी दारुच्या प्रत्येकी ९० मिलीच्या बॉटल्या मिळुन आल्या. त्यांनी सदर बॉटल्या जप्त करुन त्यातील एक बॉटली नमुनाकरीता राखुन ठेवुन त्याबाबतचा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा (निशाणी १२) त्यांनी दोन पंचासमक्ष तयार केला.

७) खबरी साक्षीदार क्र. १ ने पुढे असे कथन केले की, त्यानंतर त्यांनी आरोपी

विरुध्द खबरी जबाब (निशाणी १३) दाखल केला. पुढे त्यांनी त्यांच्या साक्षीत छापिल प्रथम खबर अहवाल (निशाणी १४) व सि.ए. फॉर्म (निशाणी १५) या कागदोपत्री पुराव्यातील मजकुर शाबीत केला आहे. आरोपी तर्फे त्यांचा उलटतपास नोंदविण्यात आला. परंतु, आरोपीस सहायक असे पटलावर काहीही आले नाही.

८) प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.२ रामकिसन हे तपासी अंमलदार असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत प्रस्तुत प्रकरणाच्या तपासाबाबत कथने केली आहेत. पुढे त्यांनी त्यांच्या साक्षीत रासायनिक पृथ्थकरण अहवाल (निशाणी १६) यातील मजकुर शाबीत केला आहे. आरोपी तर्फे त्यांचा उलटतपास नोंदविण्यात आला. परंतु, आरोपीस सहायक असे पटलावर काहीही आले नाही.

९) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचा उहापोह करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने खबरी यांचे साक्षीसह नमुना बॉटली वाहुन नेणाऱ्या कर्मचाऱ्याची साक्ष नोंदविली नाही. दारुबंदी कायद्या अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये आरोपी विरुध्द दोष सिध्दीसाठी नमुना बॉटली वाहुन नेणाऱ्या कर्मचाऱ्याची साक्ष नोंदविणे महत्वाचे असते. कारण, सदर कर्मचारी हा नमुना बॉटली रासायनिक प्रयोगशाळेत जमा करतो व रासायनिक पृथ्थकरण अहवालावरुन आरोपीच्या ताब्यात जप्त केलेले द्रव्य हे दारु होते किंवा नव्हते, हे स्पष्ट होते. या अनुषंगे प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहिला असता साक्षीदार क्र. १ च्या पुराव्यावरुन मौजे तिनकवाडी येथे आरोपीच्या हॉटेलमधुन देशी दारुच्या बॉटल्या जप्त केल्याचे व त्यातील एक बॉटली नमुनाकरीता राखुन ठेवल्याचे दिसुन येते. परंतु,

नमुना बॉटली साक्षीदार क्र. १ याने पोलीस स्टेशनमध्ये मुद्देमाल कक्षात जमा केल्यानंतर ती कधी तपासणी करीता प्रयोगशाळेत पाठविण्यात आली. तसेच सदर नमुना बॉटलीच नमुना बॉटली वाहुन नेणाऱ्या साक्षीदाराने घेउन गेली किंवा कसे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०) तसेच अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणात दोन्ही पंच साक्षीदार तपासले नाहीत. परिणामी, खबरी याच्या साक्षीवर विसंबुन राहुन प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा संशयापलीकडे जाऊन शाबीत झाला असे म्हणता येणार नाही. तसेच साक्षीदार क्र. २ याचा पुरावा हा तपासाच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे त्यांच्या पुराव्यातुन कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. या सर्व बाबी अभियोग पक्षाच्या पुराव्यास मारक ठरतात.

११) एकंदरीत पटलावर उपलब्ध झालेल्या साक्षीपुराव्याचा उहापोह केला असता असे दिसुन येते की, खबरी साक्षीदार क्रमांक १ यांच्या पुराव्यातुन आरोपीच्या हॉटेलमधुन देशी दारु जप्त केल्याचे जरी कथन केले असले तरी अभियोगपक्षाच्या एकंदरीत तोंडी व लेखी पुराव्याबाबत वरील विवेचनावरुन संशय निर्माण होतो. न्यायाच्या स्थित परिस्थितीनुसार सदर संशयाचा फायदा आरोपी मिळण्यास पात्र आहे. परिणामी अभियोगपक्षास आरोपी विरुध्द लावण्यात आलेला दोषारोप म्हणजे दिनांक ३१/०५/२०२२ रोजी १८.३० ते १९.०० वाजताच्या दरम्यान मौजे तुकुम सावली येथे आरोपीच्या हॉटेलमध्ये, आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशिररित्या १७ नग देशी दारुच्या प्रत्येकी ९० मिलीच्या बॉटल्या एकुण किंमत रु.८५०/- चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला या बाबी

संशयापलीकडे जाउन शाबीत करण्यास अपयश आल्याचे सिध्द होते. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०२ करीता**

१२) वर नमुद केल्याप्रमाणे आरोपी हा सबळ पुराव्या अभावी प्रस्तुत प्रकरणातुन निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. संपुर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, पोलीसांनी देशी दारुच्या एकुण १७ बॉटल्या जप्त केल्या होत्या. त्यापैकी एक बॉटली रासायनिक पृथ्थकरण अहवालासाठी प्रयोगशाळेत पाठविली होती. उर्वरीत १६ देशी दारुच्या बॉटल्या योग्य त्या विल्हेवाटीसाठी आव्हान कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपुर यांच्याकडे वर्ग करण्यात याव्यात. यास्तव, मी मुद्दा क्र. ०२ चे संबंधाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) आरोपीची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) च्या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) देशी दारुच्या प्रत्येकी ९० मि.ली. च्या एकुण १६ बॉटल्या आव्हान कालावधीनंतर जिल्हा उत्पादन शुल्क, चंद्रपुर यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात.

३) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रे व जामीनदारांचे बंधपत्रे रद्द करण्यात येतात

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता रक्कम रुपये

१५,०००/- चे वैयक्तीक व जामीनदारांची बंधपत्रे दयावी.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2024.05.22 16:27:37 +0530

दिनांक :- २१/०५/२०२४.

स्थळ :- सावली.

**(अ.सं. जगताप)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सावली.